माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क विभाग
शासन आदेश क्रमांकः मावज-२०२६/४४/प्र.क्र.१५/मावज-२(३४-अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १३ ऑगस्ट, २०२६

वाचा :- १) माहिती व जनसंपर्क विभाग, शासन आदेश क्र. मावज -२०२६/४४/प्र.क्र.१५/मावज-२, दिनांक २२.०७.२०२६

शासन आदेश

संदर्भाधिन आदेशान्वये खालील नमूद अधिकाऱ्यांच्या नावासमोरील स्तंभ ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली होती.

आता, या आदेशान्वये खालील नमूद अधिकाऱ्यांच्या नावासमोरील स्तंभ ३ मध्ये दर्शविलेल्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्यात येऊन त्यांची सुधारित पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव/	शासन आदेश दिनांक २२.०७.२०२६ अन्वये देण्यात आलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापनेचे पद व कार्यालय
१	२	३	४
१	श्री.गजानन वि.जाधव	माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड	माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर
२	श्री. विजय राऊत	माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर	माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, अकोला

०२. तसेच, श्री. रणजित सिंह राजपूत, जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार यांना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील नियम ४(४) (दोन) व नियम ४(५) नुसार अपवादात्मक परिस्थितीत प्रशासकीय गरज लक्षात घेता प्रशासकीय कारणास्तव बदलीस मुदतवाढ देण्यात आली होती. याबाबत या आदेशन्वये श्री. रणजीत सिंह राजपूत यांची कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव/	पदनाम व सध्याचे कार्यालय	बदली नंतरचे पद व कार्यालय
१	२	३	४
१	श्री. रणजितसिंह राजपूत	जिल्हा माहिती अधिकारी, नंदूरबार	जिल्हा माहिती अधिकारी, धुळे

०३. वरील अधिकारी यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी आदेशाच्या दिनांकापासून त्यांच्या रकाना क्र.३ येथील पदावरुन तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर तात्काळ रुजू होऊन आवश्यक अहवाल संबंधित कार्यालयांस तसेच शासनास विनाविलंब सादर करावा. उपरोक्त अधिकाऱ्यांचे दिनांक ०१.०८.२०२६ पासूनचे वेतन बदली झालेल्या ठिकाणी अदा करण्यात यावे.

०४ श्री. गजानन वि. जाधव यांच्याकडील जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, गडचिरोली या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपर्यत कायम ठेवण्यात येत आहे.

०५. तसेच उक्त बदलीच्या पार्श्वभूमीवर एखादे पद रिक्त राहत असल्यास प्रशासकीय अडचण होऊ नये याकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१८/प्र.क्र.२०८/कार्या-१२ दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ मधील तरतूदीनुसार अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत योग्य ती दक्षता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने घ्यावी.

०६. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. बदली झालेल्या अधिकाऱ्याने बदलीनंतरच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधी केलेल्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही व त्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

०७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१४४६१६८२३८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.08.13 15:10:32 +05'30'

(युवराज सोरेगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव (मा.व ज.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), मुंबई, नागपूर,
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
८. संचालक (माहिती), नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.
९. सर्व विभागीय उपसंचालक (माहिती),
१०. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
११. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती/चंद्रपूर / अकोला/धुळे/नंदुरबार/ नांदेड.
१२. संबंधित अधिकारी (मा.व ज. मार्फत),
१३. माहिती व जनसंपर्क विभाग / का.३४,
१४. निवड नस्ती (का.३४-अ)